## यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लाखांदूर जि.भंडारा

### महिला विकास व तक्रार निवारण समिती अहवाल

**सत्र २०२१—२२**

महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे सत्र २०२१—२२ करिता पोर्ट—फोलिओ तयार करण्यात आले. त्यानुसार महिला विकास व तक्रार निवारण समिती ची स्थापना करण्यात आली. या समितीची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे.

अध्यक्ष— प्रा.डॉ. रिता आर.राऊत

सदस्या—प्रा.डॉ. अल्का ए. दहिकर

सदस्य —प्रा.डॉ.भारत व्ही. नखाते

सदस्या—प्रा.एन.परचाके

सदस्या—प्रा.एस.जुआरे

सदस्या—प्रा.एस.बंसोड

सदस्या—कु.सुष्मा गोमासे

विद्यार्थिनी प्रतिनीधीः— कु.ऑचल हर्षे

कु.किरण सौंदरकर

कु.सिमा सहारे

कु.पल्लवी ढोमणे

महिला विकास व तक्रार निवारण समितीअंतर्गत विद्यार्थिनींच्या विविध समस्या सोडविल्या जातात तसेच त्यांच्या सुरक्षिततेकरिता महाविद्यालयात तक्रार पेटी आणि सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावण्यात आले आहे. विद्यार्थिनींना येणाऱ्या समस्या सोडविण्याकरिता आणि त्यांच्या सर्वांगिण विकासाकरिता विविध मार्गदर्शनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. उदा. लैंगिक अत्याचार संबंधी जागृतीचे कार्यक्रम, रोजगार संबंधी कार्यक्रम, विविध स्पर्धा इ. अशा विविध जाणीव—जागृतीचे कार्यक्रम सत्र २०२१—२२ या सत्रात राबविण्यात आले.

करिता सदर अहवाल माहितीस्तव सादर.

Principal
Y. C. College, Lakhandur
Dist. Bhandara

(Dr. R. R. Raut)
महिला विकास व तक्रार निवारण समिती प्रमुख

Scanned with OKEN Scanner

# अहवाल

## 8 मार्च जागतिक महिला दिन साजरा

स्थानीक यशवंतराव चव्हाण कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लाखांदूर येथे महिला विकास व तक्रार निवारण समिती आणि तालुका विधी सेवा समिती लाखांदूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम दि.8 मार्च 2023 रोज बुधवारला घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. व्ही. दडवे हे होते. त्यांनी यावेळी महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या

स्त्री सक्षमीकरण ही काळाची गरज आहे, यात स्त्रियांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा देऊन काम करावेच परंतु स्वतःला पुरुषांप्रमाणे मजबूत करून आणि आपले आरोग्य टिकवून त्याला उच्च शिक्षणाची जोड देऊन उंच भरारी घ्यावी, असे मत प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले श्रीमती पी.एन.कोकाटे,दिवाणी न्यायधीश लाखांदूर यांनी मांडले.

कार्यक्रमाला उपस्थित विधीज्ञ श्री आर. के. ठवरे यांनी एसिड हल्ला संबंधी असलेल्या नालसा योजनेची माहिती दिली. तसेच विधीज्ञ राऊत यांनी बाल विवाह हे महीलांकरीता अत्यंत दुःखद बाब आहे. आज जर महिलांचे शिक्षणाचे प्रमाण कमी झाले तर बालविवाह संस्कृती नक्कीच पुन्हा जागा घेईल आणि तेच हलाखीचे जीवन स्त्रियांच्या नशिबाला पुन्हा घेरून यशस्वी होईल. याकरिता महिलांनी जागृत राहून बालविवाह प्रतिबंधक कायद्यांचे ज्ञान ठेऊन वाटचाल करा, असे आवाहन केले .

विधीज्ञ श्री. सुखदेवे यांनी महिलांच्या कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक अत्याचार कशाला म्हणतात याचे विवेचन केले सोबतच विधीज्ञ श्री.देशमुख यांनी हुंडाबंदि विषयी विविध कायदे विद्यार्थिनींना समजावून दिले.

Principal
Y. C. College, Lakhandur
Dist. Bhandara

Scanned with OKEN Scanner

विधीज्ञ श्री.ऐंचीलवार यांनी घरेलु हिंसाचार हा आधुनिक काळात विघातक प्रवृत्ती आहे. एक मानसिक विकृती निर्माण होऊन त्यामधून शारीरिक आणि मानसिक हिंसाचार घडतात. यासंबंधीचे विविध कायदे सांगून महिलांना सुरक्षितता देण्यासंबंधी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्याकरिता आणि विद्यार्थ्यांकरिता योग्य व्यासपीठ मिळावे तसेच त्यांनी आपले सुप्त गुण विकसित करावे म्हणून प्रश्नमंजुषा आणि नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या.

कार्यक्रमाचे संचालन प्रा डॉ.रिता राऊत यांनी केले तर आभार प्रा.नीतू परचाके यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महिला समितीच्या सदस्या प्रा. एस.जूआरे, प्रा.एस. बंसोड, एस.गोमासे आणि सर्व प्राध्यापक वृंद, प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

महिला विकास व तक्रार निवारण समिती प्रमुख
महिला तक्रार निवारण समिती
यशवंतराव चव्हाण
महाविद्यालय लाखांदूर

प्राचार्य
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
लाखांदूर, जि. भंडारा

Scanned with OKEN Scanner




कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य पडवे सर.




प्रतिमेचे दिपप्रज्वलन करताना दि. न्यायाधिश







कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थी


प्राचार्य
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
लाखांदूर, जि. भंडारा

महिला तक्रार निवारण समिती
यशवंतराव चव्हाण
महाविद्यालय लाखांदूर

Scanned with OKEN Scanner




मार्गदर्शन करताना दिवाणी न्यायाधिश श्रीमती - पी. कोकाटे







प्राचार्य
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
लाखांदूर, जि. भंडारा

महिला तक्रार निवारण समिती
यशवंतराव चव्हाण
महाविद्यालय लाखांदूर

Scanned with OKEN Scanner

वर्तमानपत्रातील बातमी

मेट्रो सिटी
नागपुर मेट्रो समाचार
नागपुर, रविवार, 12 मार्च 2023

# महिला दिवस पर दी गई कानूनी जानकारी



लाखांदूर. यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य और विज्ञान महाविद्यालय में महिला विकास, शिकायत निवारण समिति और तालुका विधि सेवा समिति सहयोग से विश्व महिला दिवस मनाया गया. कार्यक्रम की अध्यक्षता प्राचार्य डॉ.दडवे ने की। डॉ.दडवे ने इस अवसर पर सभी को महिला दिवस की शुभकामनाएं भी दीं। मुख्य मार्गदर्शक के रूप में उपस्थित सिविल जज पीएन कोकाटे ने कहा कि महिलाओं को पुरुषों के साथ कंधे से कंधा मिलाकर काम करना चाहिए, बल्कि पुरुषों की तरह खुद को भी मजबूत करना चाहिए और अपने स्वास्थ्य को बनाए रखते हुए उच्च शिक्षा को इसमें जोड़ना चाहिए। कार्यक्रम में उपस्थित न्याय.आर.के. ठवरे ने एसिड हमले के संबंध में नालसा योजना का विवरण दिया। साथ ही कानून विद. राउत ने कहा कि बाल विवाह महिलाओं के लिए बहुत दुखद बात है। आज यदि नारी शिक्षा का स्तर घटता है तो निश्चित रूप से बाल विवाह की संस्कृति फिर से अपना स्थान ले लेगी और हलखी का वही जीवन स्त्रियों के भाग्य को पुनर्जीवित कर सफल होगा। इसके लिए उन्होंने महिलाओं से आग्रह किया कि वे जागृत रहें और बाल विवाह निवारण कानूनों के बारे में अपनी जानकारी रखें। विधीज्ञ सुखदेवे ने बताया कि कार्यस्थल पर महिलाओं को यौन उत्पीड़न क्यों कहा जाता है. साथ ही न्यायविद देशमुख ने दहेज के बारे में विभिन्न कानून के छात्रों को समझाया। विधीज्ञ ऐंचीलवार ने कहा कि आधुनिक समय में घरेलू हिंसा एक विनाशकारी प्रवृत्ति है। एक मानसिक विकार पैदा होता है और यह शारीरिक और मानसिक हिंसा की ओर जाता है। उन्होंने इस संबंध में विभिन्न कानून बताते हुए महिलाओं को सुरक्षा प्रदान करने पर मार्गदर्शन दिया।

प्राचार्य
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
लाखांदूर, जि. भंडारा

महिला तक्रार निवारण समि...
यशवंतराव चव्हाण
महाविद्यालय लाखांदूर

## महिला विकास व तक्रार निवारण समितीचा अहवाल

स्थानिक यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील महिला विकास व तक्रार निवारण समितीतर्फे दिनांक ८ मार्च २०२३ ला जागतिक महिला दिनानिमीत्त विद्यार्थिनींना कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात आले. यात मा. कोकाटे, विधीज्ञ, स्थानिक विधी कोर्ट, लाखांदूर हे उपस्थित१८ ऑगष्ट ते २० ऑगष्ट २०२३ ला महिला संरक्षण प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत मार्गदर्शक म्हणून मा. लोथे, संरक्षण अधिकारी, अभय संरक्षण केंद्र लाखांदूर, मा. अनिता खोब्रागडे विधी सल्लागार भंडारा व प्रशिक्षक गि--हेपुंजे हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थीनींना कादयेविषयक माहिती दिली आणि त्यांच्याशी हितगुज साधला. अशा अनेक प्रकारचे कार्यक्रम घेउन विद्यार्थिनींना जागृत करण्याचा प्रयत्न केला जातो.

प्राचार्य
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
लाखांदुर जि. भंडारा

समिती प्रमुख
प्रा. डॉ. रिता आर. राऊत.